# ३१ मार्च २०१०

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या सहकारी कायद्यानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे २००९ - २०१० हे आर्थिक वर्ष ३१ मार्च २०१० रोजी संपत आहे. सहकारी संस्थांना ह्या दिवसाची विशेष दखल घेणे क्रमपात्र आहे. १५ मे २०१० पर्यंत सहकारी संस्थांचे सर्व हिशोब, ताळेबंद व नफातोटा पत्रके पुर्ण करण्याची जबाबदारी कायद्याने बंधनकारक आहे. यासाठी ३१ मार्च २०१० अखेर मागील संपूर्ण वर्षाचा सर्व प्रकारचा कारभार व व्यवहार पूर्ण करावयाचा आहे.

प्रामुख्याने बँका व पतसंस्था ह्या थेट आर्थिक देवाण घेवाण करणाऱ्या सहकारी संस्थांची ह्या दिवशी कसरत करण्याची वेळ असते. थकबाकीचे प्रमाण, ठेवीचे प्रमाण, कर्ज वाटपाचे प्रमाण, लिक्वीडिटी इत्यादी महत्वाच्या विषयांबाबत विशेष लक्ष्य पूर्ण करण्याची जबाबदारी सुध्दा ३१ मार्च २०१० अखेर पर्यंत या संस्था चालकांची आहे. विशेषतः कलम ८१ नुसार संस्थांचे लेखापरिक्षण हा फार महत्वाच्या कार्यप्रणालीचा भाग पुर्ण करावयाचा असतो. त्यासाठी ३१ मार्च अखेरचे नाफातोटा पत्रक, ताळेबंद, संस्थेचा उपविधी व सहकारी कायदा याला अधिन राहून चौकटीतील सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक असते. कलम ८१ च्या १ ब नुसार प्रत्येक सहकारी वर्षात निदान एकदा निबंधकाने ठेवलेल्या लेखापरिक्षक नामिकेतील लेखापरिक्षका करवी किंवा ‘‘ इन्सिस्टयुट ऑफ चार्टड अकौंटंट ऑफ इंडिया ’’ या संस्थेने दिलेले सहकार लेखा परिक्षण प्रमाणपत्र धारण करणाऱ्या एखाद्या सनदी लेखापाला करवी आपल्या हिशोबांची लेखापरीक्षा करण्याची तजवीज केली जाते. आणि त्यानुसार लेखापरीक्षण होत असते.

परंतु निबंधक एका एका संस्थेवर एका पेक्षा जास्त लेखापरिक्षकांची नेमणुका करण्यामध्ये अलिकडच्या काळात सरसावलेले आहेत. कारण राज्य शासन, सहकार आयुक्त यांचे नियंत्रण या कार्यपध्दतीवर निश्चित स्वरूपाचे राहिलेले नाही. आणि अशा पध्दतीने लेखा परिक्षकांची नेमणुक केल्यामुळे संबंधितांवर इंडियन पिनल कोड खाली फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मायबाप सरकारने कायद्यात तरतुद केलेली नाही. जी संस्था या विषयात आवाज उठविते, पत्रव्यवहार करून तक्रार करते त्यांनाच न्याय मिळण्याची शक्यता असते. परंतु मोठ्या प्रमाणात संस्था ह्या एकापेक्षा अधिक हिशोब तपासणीच्या कचाट्यात सापडतात. आणि आलेले संकट दुर करण्यासाठी नाईलाजाने बळी पडतात. एकूण हा धंदा केवळ पैसे उकळण्याचा आहे. यासाठी संबंधितांना कोणाचीहि भिती नाही. वास्तविक एका संस्थेवर एकापेक्षा अधिक लेखापरिक्षकांची नेमणूकच कशी होते? कसे करतात? केव्हा करतात ? व या सर्वांची पडताळणी करण्याची यंत्रणा सरकार व सहकार आयुक्तांकडे नाही. व तशी त्यांना गरजही भासत नाही. **न्याय मिळविण्यासाठी न्याय मागावा लागतो.** आणि राज्यात असे न्याय मागणारे किती लोक आहेत. आणि नेमका ह्याच परिस्थितीचा गैरफायदा संबंधीत नेहमी घेत असतात. परंतु दिवसेंदिवस सहकारातील कार्यकर्ते निर्भीड होत असल्याचे चित्र दिसू लागले आहे. त्यामुळे आमच्या सारख्या कार्यकर्त्यांची ह्या अन्याया विरूध्द झगडताना उमेद वाढत असते. म्हणुन हा अग्रलेख ह्याच विषयावर आगावू सूचना व माहितीसाठी सर्व वाचकांसाठी सादर करीत आहोत.

जर एखाद्या संस्थेस एकापेक्षा जास्त लेखापरिक्षकाची नेमणूक निबंधकाने केल्याची पत्रे प्राप्त झाली

तर त्या संस्थेने जे पत्र संस्थेस पहिले प्राप्त झाले त्यांचेच मार्फत संस्थेचे लेखापरिक्षण करून घ्यावे. व दुसऱ्या लेखापरिक्षकास व त्याची नेमणूक करणाऱ्या निबंधकास तसे स्पष्टपणे लेखी पत्र देवून पोहच घ्यावी. एवढे करून सुध्दा नंतरचा लेखापरिक्षक त्याचेच मार्फत लेखापरिक्षण करून घेण्याचा अट्ाहास करीत असेल तर त्याची रितसर लेखी तक्रार मा. निबंधक व नजीकचे पोलिस स्टेशन यांचेकडे करून त्याची एक प्रत आम्हाला पाठवावी. आपल्या लक्षात येईल की लेखापरिक्षकाच्या नेमणुकीचा व लेखापरिक्षण कोणाकडून करून घेण्याचा विषय १०० टक्के मिटलेला असेल.

दुसरे विशेष महत्वाचे की लेखापरिक्षणात **अ स्टार, अ, ब, क, ड** इत्यादी जी वर्गवारी दिली जाते याबाबत बिलकुल घाबरून जायचे काम नाही. ज्या सहकारी संस्थांना दिलेल्या लेखापरिक्षणाच्या वर्गवारीबाबत अन्याय वाटत असेल व लेखापरिक्षण करण्याच्या कार्यपध्दतीवर आक्षेप असेल त्यांनी ह्या संदर्भात आमचेशी कृपया संपर्क साधावा जेणेकरून आपल्या संस्थेवर अशा प्रकारचा अन्याय करण्याची हिंमत भविष्यात कोणीही करू शकणार नाही.

एकंदरीत लेखापरिक्षण, लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्याची कार्यपध्दती याबाबत सहकारी संस्थांनी जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण फी चे दर सहकार कायद्यानुसारच म्हणजेच नियम ६९ (९) नुसार फक्त संबंधितांना द्यावेत ह्या संबंधितांना क्रॉस धनादेशाने द्यावेत ह्या व्यतिरिक्त कुठलाही उद्योग संस्थेने देवून पाप करू नये. आणि अशा प्रकाची गोष्ट करण्यास आपणास कोण भाग पाडत असेल तर कृपया आमच्याशी संपर्क करावा.

आम्हास हे सुध्दा माहित आहे की, कोणाच्या आर्थिक फायद्याच्या आड कोण आले तर त्यांचेवर कलम ८३, ७८, ८८ इत्यादी कलमाखाली वेठीस धरले जाईल याची भिती असते. परंतु ह्या बाबतीत संस्थांनी निर्भिडपणे मुकाबला करायला पाहिजे आणि वेळोवेळी होत असलेल्या अन्यायाविरूध्द चाकोरीतून व लोकशाही पध्दतीने न्याय मागण्यासाठी सातत्याने जागरूक रहावयास पाहिजे. म्हणून ३१ मार्च २०१० ह्या वर्ष अखेर दिवशी वरील ससेमिरी, भिती व संभाव्य कारवाया टाळण्यासाठी व संबंधितांचे लुटण्याचे धंदे बंद करण्यासाठी सर्व स्तरावर जागरूक रहावे असे आवाहन करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**